"कृपया प्रसिध्दी करिता.

कृपया प्रसिद्धी करिता

जा.क्र. (9)

माहिती व जनसंपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका
२५/७/२०२५







आरोग्य कार्यालय,

पुणे महानगरपालिका

पुणे जिल्हयामध्ये लम्पी चर्म रोगाचे नियंत्रण,प्रतिबंध व निर्मुलन करणेसाठी बैलगाडा शर्यतीचे आयोजन,गोवर्गीय प्राण्याची (म्हैस वर्गातील प्राणी वगळून) प्रदर्शन यात्रा भरविणे, बाजारातील खरेदी विक्री, वाहतूक व नेआण करणे बाबत.

सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, औंध पुणे यांचेकडे जिल्हयामधील गोवर्गीय जनावरांमधील पाठविण्यात आलेले रोग नमुने हे लम्पी चर्म रोगासाठी होकारार्थी आले आहेत.

पुणे जिल्हयात लम्पी चर्मरोग या संसर्गजन्य रोगाचा गोवर्गीय जनावरांमध्ये प्रादुर्भाव झालेला असुन दैनंदिन अहवालानुसार जिल्हयातील 9 तालुक्यामध्ये रोगाचे संसर्गकेंद्र (Epicentre) निदर्शनास आले आहेत व प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून प्राण्यांमधील "संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, 2009" (Prevention and Control of Infections and Contagious Diseases in Animals Act, 2009) मधील तरतुदीनुसार व वाचले क्र.3 अन्वये अनुसुचित रोगांचा प्रतिबंध, नियंत्रण व निर्मुलन करण्यासाठी **जिल्हाधिकारी यांना** सर्व अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

त्याअर्थी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे या आदेशान्वये संपुर्ण पुणे जिल्हा गोवर्गीय जनावरांमधील लम्पी चर्म रोग या रोगासाठी" नियंत्रित क्षेत्र" म्हणून घोषित करुन खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

1. लम्पी चर्म रोगावर नियंत्रण, प्रतिबंध व निर्मूलन करता येईल आणि (गुरे) आणि गोजातीय प्रजातींमधील इतर सर्व प्राणी (म्हैस वर्गीयवगळून) यांना ज्या ठिकाणी ते पाळले जातात त्या ठिकाणापासुन उक्त नियंत्रण क्षेत्रातील किंवा क्षेत्राबाहेरील अन्य कोणत्याही ठिकाणी ने आण व वाहतूक करतांना किमान 28 दिवसांपूर्वी लम्पी चर्मरोगासाठी प्रतिबंधात्मक गोट पॉक्स लसीकरण केल्याचे लसीकरण प्रमाणपत्र सोबत बाळगणे बंधनकारक राहील.

2. कोणत्याही व्यक्तीस, उक्त बाधीत गोजातीय प्रजातीचे जीवंत अथवा मृत प्राणी, कोणत्याही उक्त बाधीत झालेल्या गोजातीय प्राण्यांच्या संपर्कात आलेली कोणत्याही प्रकारची वैरण, प्राण्यांच्या निवा-यासाठी असलेले गवत किंवा अन्य साहित्य आणि अशा प्राण्यांचे शव, कातडी किंवा

P.T.O →

कोणताही भाग किंवा अशा प्राण्यापासुनचे अन्य कोणतेही उत्पादन उक्त नियंत्रित क्षेत्रामधुन बाहेर नेण्यास मनाई करीत आहे.

3. कोणत्याही गोजातीय प्रजातीच्या प्राण्यांचे बाजार भरवणे व बाजारातील खरेदी विक्री करतांना किमान 28 दिवसांपूर्वी लम्पी चर्मरोगासाठी प्रतिबंधात्मक गोट पॉक्स लसीकरण केल्याचे लसीकरण प्रमाणपत्र व पशुवैदयकीय अधिका-यांचा आरोग्य दाखला सादर करणे बंधनकारक राहील

4. गोवर्गीय प्राण्यांच्या शर्यती आयोजित करणे, जत्रा भरवणे, प्रदर्शन आयोजित करणे इ. प्रसंगी सहभागी होणारी सर्व गोवर्गीय प्रजातीच्या जनावरांचे किमान 28 दिवसांपूर्वी लम्पी चर्मरोगासाठी प्रतिबंधात्मक गोट पॉक्स लसीकरण केल्याचे लसीकरण प्रमाणपत्र व पशुवैदयकीय अधिका-यांचा आरोग्य दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

5. प्रयोगशाळा निदानामध्ये जिल्हयातील ज्या भागातील पशुपालकांचे गोजातीय प्रवर्गातील जनावरांना लम्पी चर्म रोगाची लागण झाल्याचे निष्कर्ष होकारार्थी येतील अशा ठिकाणापासुन 5 कि.मी त्रिजेच्या परिघामधील सर्व संक्रमित न झालेले जनावरांचे रिं व्हॅक्सीनेशन त्वरीत करुन रोगाचा फैलाव इतरत्र होणार नाही यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे.

6. लम्पी चर्म रोगाचा फैलाव इतरत्र होवू नये यासाठी केंद्र शासनाच्या ॲडव्हायजरी नुसार बाहय किटक नियंत्रण कार्यक्रम (Vect control Programme) जिल्हयामधील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये (नगरपालिका, नगरपरिषद, महानगरपालिका ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात) राबविणेत यावा.

पुणे महानगरपालिका हद्दीतील (गुरे) आणि गोजातीय प्रजातींमधील इतर सर्व प्राणी (म्हैस वर्गीयवगळून) जनावरांचे आरोग्य जपण्यासाठी पुणे महानगरपालिका हद्दीतील गोपालक,पशुपालक,गोरक्षण संस्था,व दुग्ध व्यवसायिक या सर्व सबंधिताना सदर परिपत्रकाद्वारे प्राण्यामधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण आभिनियम ,२००९ अन्वये लम्पी चर्मरोगाबाबत नियंत्रण व उपाययोजना करणे सबंधी सूचित करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका